# पं. तुळशीदास बोरकर स्कूल ऑफ हार्मोनियम - तंत्रज्ञान आणि गुरु-शिष्य परंपरेची सांगड

संगीत कार्यक्रमास, विशेषतः शास्त्रीय संगीत कार्यक्रमास श्रोत्यांमध्ये जाणत्या चोखंदळ मंडळींचा भरणा असतो. गुरुशिष्य परंपरा व शास्त्रीय संगीत याचे अतूट नाते आहे. संगीत कला चांगल्या गुरु कडून आत्मसात केल्यावरच चांगला कलाकार नावारूपास येतो असा आजतागायतचा परिपाठ आहे. परंतु सांप्रत धकाधकीच्या व गतिमान जीवनात, वेळ नाही, जमत नाही, असे वारंवार ऐकू येते. शिवाय जगभर वेगवेगळ्या देशात राहत असणाऱ्या इच्छुक शिष्यांना, त्यांच्या गावी उत्तम गुरु मिळेलच याची ही खात्री नसते. संगणक पर्वाची नांदी झाली आहे, तर आजच्या या इंटरनेट युगात, तंत्रज्ञानाची आणि गुरु-शिष्य परंपरेची सांगड घालणारा एक नूतन प्रयोग नुकताच घोषित झाला.

पुणे शहरात "बाजा गाजा" एक्स्पो हा लोकप्रिय कार्यक्रम दि. ५ फेब्रुवारी २०११ रोजी संपन्न झाला. भारताच्याच नाही तर जगाच्या विविध भागातून कलाकार व रसिक जन उपस्थित होते. पुणे विद्यापीठ, मणिपाल विद्यापीठ, अमेरिकेतील Stanford University, University of California, Berkeley, कॅलिफोर्नियामधील अली अकबर खान कॉलेज, ऑस्ट्रेलियातील Macquarie University, अशा संस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत, पं. तुळशीदास बोरकर स्कूल ऑफ हार्मोनियम हे विद्यापीठ स्थापन झाल्याची घोषणा करण्यात आली. उपस्थितांनी व प्रसार माध्यमांनी या घोषणेस उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला.

हार्मोनियम किंवा संवादिनी मूलतः पाश्चात्य संगीत वाद्य आहे. भारतात त्याचा प्रचार व प्रसार करण्यात, पं. गोविंदराव टेंबे यांचे नाव अग्रक्रमी घेतले जाते. त्यानंतर पं. विठ्ठलराव कोरगावकर, पं. भीष्मदेव वेदी, पं. ग्यानबाबू घोष अशा इतर मोठ्या कलावंतांनी संवादिनी वादनाच्या लोकप्रियतेमध्ये मौलिक भर घातली. याच पठडीत, संवादिनी या वाद्यावर पी मधुकर उर्फ मधुकर पेडणेकर यांनी नूतन वादन तंत्र निर्माण केली आणि अतिविलक्षण, न भूतो न भविष्यति असे प्रभुत्व संपादन केले. वादनतन्त्रात ते खरोखर जादुगार होते आणि त्यांचे प्रतिभावंत वादन हे जणू काही एक चमत्कारच असे.

हार्मोनियमची भारतात बांधणी करणाऱ्या कारागीरांमध्ये श्री एच. पी. भगत हे नाव सर्वात महत्वाचे आहे. त्यांच्या पासून भारतीय संगीतास हे वाद्य अनुकूल करण्याकरता त्याच्या बांधणीमध्ये, ट्युनिंग मध्ये बऱ्याच कलाकारांनी भर पाडली - त्यामध्ये पं. गोविंदराव टेंबे, आचरेकरबुवा, पं. भीष्मदेव वेदी, पं. तुळशीदास बोरकर, पं. मनोहर चिमोटे, आणि हल्लीच्या काळात डॉ. विद्याधर ओक, डॉ. अरविंद थत्ते, हिंगे बंधू, श्री दशरथ बेनगुडे यासारखी काही नावे घ्यावीशी वाटतात. हार्मोनियमला संवादिनी हे सुंदर अभिधान बहाल करण्याचे श्रेय पं. मनोहर चिमोटे यांना दिले जाते.

### *पं .तुळशीदास बोरकर*



वादनतन्त्राचे जादुगार, पी. मधुकर यांचे परमशिष्य पं तुळशीदास बोरकर हे आज भारतीय संगीतातील अग्रगण्य व्यक्तिमत्व आहे. श्री. केदार नाफडे, पं. तुळशीदास बोरकर यांचे शिष्य असून, या संवादिनी संगणक पाठशाळेचे जनक, संचालक, संयोजक व नियोजक आहेत.

सांप्रत काळात, संवादिनी हा संगीत मैफलीचा अविभाज्य भाग झाला आहे. शास्त्रीय, उपशास्त्रीय, गझल, भजन, कीर्तन, नाट्यसंगीत भक्तिगीत, भावगीत इत्यादी सर्व संगीत प्रकारात संवादिनीचा मुक्त वापर केला जातो. स्वतंत्र संवादिनी वादनाची लोकप्रियता देखील वाढत आहे. यापाठी, वरील नावांखेरीज पं रामभाऊ बिजापुरे, पं अप्पा जळगावकर, पं पुरुषोत्तम वालावलकर, पं गोविंदराव पटवर्धन आणि महाराष्ट्राचे लाडके पु. लं. देशपांडे इत्यादी कलाकारांचाही मोठा वाटा आहे.

संगणक द्वारा संवादिनी वादनाचे घरबसल्या प्रशिक्षण हा अभिनव प्रयोग आहे. या प्रयोगापाठी पं. तुळशीदास बोरकर यांचे "संवादिनी साधना" हे पुस्तक हे स्फूर्तीस्थान आहे. पी मधुकर व पं तुळशीदास बोरकर या दिग्गाज्जांची प्रतिभा आणि त्यांचे अगाध जीवनकार्य, याचा फायदा जगाच्या पाठीवर कुठेही रहात असणाऱ्या इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा, हेच या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे.

संगणक युगामध्ये ***http://www.aceopen.com/*** हे संकेतस्थळ हे आजचे गुरुकुल. संगणकाद्वारे सुलभतेने शिकवता यावे, म्हणून ५ - ७ वर्षांच्या सबंध प्राथमिक पाठ्याक्रमाची पाच - पाच मिनिटाच्या धड्यांमध्ये अतिशय विचारपूर्वक विभागणी केली गेली आहे. या धड्यांमध्ये संवादिनी वाजवताना विशिष्ट सुरांवर विशिष्ट बोटांचा वापर कसा करावा, भात्याचा वापर कसा करावा आशा सर्व सूक्ष्म बाबींचा सखोल उहापोह देखील केला आहे.

पाच मिनिटांचा धडा इंटरनेट विडीयो वर बघून, तो आत्मसात करून, त्यावर अर्धा - एक तास रियाज करून, आपल्या स्वतःच्या वादनाचा विडीयो गुरूला शिष्याने पाठवायचा, आणि त्याचे निरीक्षण करून गुरूने शिष्याला योग्य ते मार्गदर्शन द्यायचे, ही या विद्यापीठाची संकल्पना आहे. शिक्षण संपादन करताना गुरुचे निरीक्षण, दुरुस्ती आणि पुनारावृत्ती हे प्रगती पुस्तकाचे स्थूल मनाने स्वरूप आहे. कालांतराने, विद्यार्थ्यांचा सराव, प्रगती यावर वैयक्तिक लक्ष देऊन विद्यार्थ्यास योग्य ते मार्गदर्शन आणि प्रमाणपत्र दिले जाते.

स्वतंत्र संवादिनीवादन आणि साथसंगत या दोन्ही गोष्टी यशस्वीपणे प्रस्तुत करणे हे कठीण काम आहे. स्वतन्त्र वादनात श्रोत्यांना खिळवून ठेवण्याची आणि त्यांचे रंजन करण्यची ताकत कलाकारात असावी लागते. रागसंगीताचा आणि तालशास्त्राचा गाढा अभ्यास असावा लागतो. श्रोत्यांना अचंबित करणारे असे वाद्यावर प्रभुत्व असायला निरंतन रियाज असावा लागतो, आणि त्याचबरोबर श्रोत्यांच्या हृदयावर ठसा उमटवण्यासाठी एक हळवी संवेदनशीलता ही असावी लागते.

साथसंगत करताना, अनेक लहान मोठ्या कलाकारांबरोबर रंगमंचावर आपले वादन पेश करावे लागते. गायक कोणत्याही घराण्याचे असोत, वादकाची साथ त्याच्या अंगाने होणे जरुरी असते. आलाप, उपज अंग, गमक अंग, तान, बोलतान, आदी वादकाच्या अंगुलीतून विलक्षण सफाईने प्रतीत होणे आवश्यक असते. प्रत्येक घराण्याची सखोल माहिती आणि अभ्यास लागतो आणि गायक कलाकाराच्या गायकी बद्दल संवेदनशील वृत्ती असावी लागते - तेंव्हाच संवादिनी संगतकार खऱ्या अर्थाने यशस्वी ठरू शकतो.

***श्री केदार नाफडे***



श्री केदार नाफडे यांनी शास्त्रीय संगीताचा श्रीगणेशा आजोबा श्री दादासाहेब नाफडे यांच्याकडे केला. काही काळ पं. अरविंद गजेंद्रगडकर यांच्याकडे प्राथमिक धडे घेऊन, पं. तुळशीदास बोरकर यांचे त्यांनी शिष्यत्व पत्करले. पं तुळशीदास बोरकर यांकडे सतत १५ वर्षे प्रशिक्षण घेऊन मैफलीत स्वतंत्र वादन आणिसाथ संगतीला सुरुवात केली.

केदारजी पंडित तुळशीदासजींच्या सान्निध्यात आजतागायत आहेत. अत्रौली जयपूर घराण्याच्या ज्येष्ठ गायिका श्रीमती पद्मावती शाळीग्राम गोखले यांची ही केदाराजींना ३- ४ वर्षे मौलिक तालीम मिळाली आहे.

केदारजी विविध मैफलीतून स्वतंत्र संवादिनी वादन आणि साथ संगत करत असतात. मुंबईत अल्लादिया खां स्मृती समारोह, दादर माटुंगा कल्चरल सेंटर, विले पार्ले मुसिक सर्कल, न्यू यॉर्क मधील कार्नेगी हॉल, लिंकन सेंटर, वॉशिंगटन मध्ये स्मिथसोनियन इन्सटिट्यूट अशा अनेक मान्यवर संस्थांमध्ये त्यांचे कार्यक्रम झाले आहेत.

पं जसराज, श्रीमती पद्मावती शाळीग्राम-गोखले, पं उल्हास कशाळकर, श्रीमती वीणा सहस्रबुद्धे, श्रीमती प्रभा अत्रे, श्रीमती लक्ष्मी शंकर, पं. फिरोज दस्तूर आशा अनेक अग्रगण्य कलाकारांना त्यांनी संवादिनी संगत केली आहे.

गायकाच्या गाण्याचा अचूक वेध घेऊन कोणतीही आक्रमकता येऊ न देता, खुलवत खुलवत वादनाचा ठसा समर्थपणे उमटवण्यात त्यांचा हातखंडा आहे. आजच्या पिढीत उत्तम स्वतंत्र संवादिनी वादकांमध्ये देखील त्यांचे नावं आग्रहाने घेतले जाते. अमेरिकेत स्वतंत्र संवादिनी वादनाचा प्रसार करण्यात ते गेली बरेच वर्षं कार्यक्षम आहेत.

***- श्री रमेशचंद्र प्रधान (न्यू जर्सी)***

***संपर्क:*** *dadapradhan@yahoo.com*

(732) 216-7935